CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २७४ वा ▶ रविवार दि. ३० जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## हिंदुस्थानासाठी नेहरूंचे नखाएवढेही योगदान नाही : भिडे



**मुंबई ।** अखंड हिंदुस्थानासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नखाएवढेही योगदान नाही. मात्र कोणतेही कर्तृत्व नसताना ते भारताचे पंतप्रधान झाले, अशी टीका संभाजी भिडे गुरूजी यांनी केली. श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, यवतमाळ विभागाच्या वतीने शनिवारी येथील बलवंत मंगल कार्यालयात त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संभाजी भिडेंनी पुन्हा वादग्रस्त विधान करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. त्यांनी पंडित जवाहरलाल यांच्याविषयी वादग्रस्त विधान केल्याने टीका होऊ लागली आहे.

### न्यूज कॉलम

#### विजेच्या धक्क्याने बालकाचा मृत्यू

**शिरपूर ।** विजेचा जोरदार धक्का बसल्याने गंभीर जखमी झालेल्या बालकाचा धुळे येथे हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. रितेश अनिल पावरा असे मृत बालकाचे नाव आहे. दुर्बळ्या गावातील रमेश पावरा याच्या घरासमोरील वीज वितरण कंपनीच्या खांबात वीजप्रवाह उतरला होता. तेथे हाताने स्पर्श केल्यानंतर रितेश पावरा याला धक्का बसला. उपचार घेताना २४ जुलैस सकाळी त्याचे निधन झाले. सांगवी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

#### दुचाकी-ॲपे रिक्षा अपघातात बालक ठार

**शिरपूर।** भरधाव दुचाकीने धडक दिल्याने पे रिक्षा उलटून आठवर्षीय बालक ठार, तर तीन जण जखमी झाले. प्रवासी घेऊन जाणाऱ्या ॲपे रिक्षाला समोरून येणाऱ्या हीरो एक्स्ट्रीम दुचाकी (एमएच १८, बीवाय ८२९३)ने जोरात धडक दिली. या अपघातात रिक्षा उलटून कार्तिक सुका भिल (वय ८, रा. कन्हेरीपाडा, ता. शिरपूर) जागीच ठार झाला, तर समीर सुका भिल (रा. कन्हेरीपाडा), अनुष ताराचंद पावरा (रा. कोडीद ) व सुमनबाई कालूसिंह पावरा (रा. बालाजीनगर, शिरपूर) जखमी झाले.

# स्वर्ण पॅलेसमधील धाडसी चोरीचा लागला छडा
# जालनासह जळगावातून दोघांच्या मुसक्या आवळल्या

### पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या आग्रा रोडवरील स्वर्ण पॅलेस या सराफ दुकानातील धाडसी चोरीचा पीआय नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने छडा लावला आहे. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी जालना आणि जळगावातून दोन चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्याकडील गुन्ह्यात वापरलेली दुचाकीसह पावणे दोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

तर मुख्य आरोपी फरार असून त्यालाही लवकरच बेड्या ठोकण्यात येतील, अशी माहिती आज पोलिस अधिक्षक संजय बारकुंड यांनी पत्रपरिषदेत दिली. प्रसंगी त्यांनी आझादनगरचे पीआय नितीन देशमुख, एपीआय संदीप पाटील यांच्यासह पथकाचे विशेष कौतूक केले. आग्रा रोडवरील स्वर्ण पॅलेस या सराफ दुकानात दि.९ रोजी जुलै रोजी अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करीत तब्बल ८९ लाखांचे सोने-चांदीचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी प्रकाश जोरावरमल चौधरी (रा.नित्यानंद नगर, नटराज टॉकीज जवळ, धुळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आझादनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा घडल्यानंतर आझादनगर पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचार्यांनी सराफ दुकानातील प्राप्त सीसीटीव्ही फुटेज तसेच बाजारपेठेतील दुकानातून सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून त्याचे विश्लेषन केले. तसेच गुन्ह्याच्या तपासादरम्यान हा गुन्हा किशोर टाक (रा. जालना) याने त्यांच्या साथीदारांसह केला असल्याची गुप्त माहिती पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकातील रवाना करून आरोपीला ताब्यात घेण्याचे आदेश केले. त्यानुसार पथकातील अधिकारी व कर्मचार्यांनी जालना शहरा गाठून किशोरसिंग रामसिंग टाक (वय २५ रा.गुरुगोविंद नगर, शिवाजीनगर जवळ, जालना) यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हा गुन्हा इतर दोन साथीदारांच्या मदतीने केला असल्याचे सांगितले. त्यानुसार पथकाने किशोरसिंग टाक याचा दुसरा साथीदार झेनसिंग ऊर्फ लकी जिबनसिंग जुन्नी (वय २८ रा. नवनाथ मंदिराजवळ, हरिविठ्ठल नगर, जळगाव) याला जळगाव शहरातून ताब्यात घेतले. दोघा आरोपींकडून ६० रुपयांची १ किलो २० ग्रॅम वजनाच्या चांदिच्या पट्टी स्वरूपात ५ लगड, ७२ हजारांची १४.४३० ग्रॅम वजनाचे सोन्याच्या ३ लगड, ४० हजारांची गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १ लाख ७२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दरम्यान आरोपी किशोरसिंग टाक हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर वेगवेगळ्या जिल्हयांमध्ये तब्बल ३१ घरफोडी जबरी चोरी सारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषीकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, सहा. पोलीस निरीक्षक संदिप पाटील, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद नवगिरे, सहा. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी, पोहेकाँ योगेश शिरसाठ, पोलीस नाईक योगेश शिंदे, संदिप कढरे, अविनाश लोखंडे, पोलीस कॉन्स्टेबल अझहर शेख, सचिन जगताप, निलेश पाकड, पंकज जोंधळे, सिध्दार्थ मोरे, महिला पोलीस शिपाई पवार व पारेराव यांच्या पथकान केली. मालाचे दोन हिस्से मुख्य आरोपीकडे- गुन्ह्यात फरार असलेला तिसर्या साथीदाराने धुळ्यातील स्वर्ण पॅलेसमधील चोरीचे नियोजन केले होते.



#### चोरट्यांनी पाडला होता वाटा

**स्वर्ण पॅलेसमध्ये डाका टाकल्यानंतर तिघा चोरट्यांनी वाटा पाडल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. यातील दोन वाटे मुख्य आरोपीकडे असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या दुकानात डाका टाकण्यासाठी त्यांनी तीन दिवस अगोदर रेकी केली होती.**

**एसपींनी केले कौतुक - या कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी आझादनगर पोलीस ठाण्याचे पीआय नितीन देशमुख, एपीआय संदीप पाटील यांचे कौतुक केले. तसेच या गुन्ह्यातील मुख्य आरोपीचा शोध घेवून त्याच्याकडून उर्वरित मुद्देमाल हस्तगत केला जाईल, अशी माहिती दिली.**

#### सीसीटीव्हीमुळे माग काढणे सोपे

**सदर चोरीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. त्यानुसार पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. संशयीताच्या हातावरील टॅटू व पायातील पांढऱ्या रंगाची स्लिपर यावरुन तपासाला वेग दिला. तपास सुरु असतानाच आझाद नगर पोलीस ठाण्याचे पीआय नितीन देशमुख यांना गुप्त माहिती मिळाली की, सदर गुन्हा किशोर टाक रा.जालना याने त्याच्या साथीदारांसह केला आहे. त्यानुसार पीआय देशमुख यांनी जालन्याकडे पथक रवाना करुन किशोरसिंग रामसिंग टाक (२५) रा.गुरुगोविंद नगर, शिवाजीनगर जवळ, जालना यास ताब्यात घेतले. पथकाने त्याला विचारपूस केली असता त्याने अन्य दोन साथीदारांच्या मदतीने सदर गुन्हा केल्याची कबूली दिली. त्यानुसार पथकाने त्याचा दुसरा साथीदार झेनसिंग उर्फ लकी जिवनसिंग जुन्नी (२८) रा.नवनाथ मंदिराजवळ, हरिविठ्ठल नगर, जळगाव याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. तर तिसरा साथीदार हा मुख्य आरोपी असून त्याचा शोध सुरु आहे.**

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे विधी स्वयंसेवक प्रशिक्षण




**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण धुळे कार्यालयात दि. २७ जुलै रोजी रोजी विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणार्थींची नोंदणी केल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष आर. एच. मोहम्मद यांच्या हस्ते या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रथम सत्रात 'हिंदु विवाह कायदा, हिंदू वारस कायदा, मालमत्ता अधिकार' या विषयावर विधीज्ञ ॲड. सारंगी गुजराथी यांनी, 'वरिष्ठ नागरिकांचे कायदे' या विषयावर डॉ. योगेश सुर्यवंशी यांनी तर 'महिला विषयक कायदे' या विषयावर ॲड. रसिका निकुंभ यांनी विविध संदर्भ आणि उदाहरणे देवून सविस्तर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात 'ॲरेस्ट ॲंड रिमान्ड' या विषयावर सह दिवाणी न्यायाधीश क स्तर श्रीमती एस. व्ही. मडके यांनी सखोल माहिती दिली. त्याचप्रमाणे 'बेल' या विषयावर दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर ए. बी. चव्हाण यांनी विस्तृत विवेचन करुन प्रशिक्षणार्थींना माहिती दिली. 'महसूल कायदे' याविषयी मुख्य लोकअभिरक्षक कार्यालय धुळेचे ॲड, डी. एस. महाजन यांनी विविध मुद्दे स्पष्ट करीत मार्गदर्शन केले.

'विधी स्वयंसेवकांची जबाबदारी व कर्तव्ये' याबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संदीप स्वामी यांनी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर विधी सेवा प्रधिकरणावर निवड झालेल्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक ओळखपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अधीक्षक ए. एस. पाठक यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध कायद्यांचे सखोल ज्ञान मिळून सविस्तर माहिती समजून घेता आल्याचे समाधान प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात एस. एम. बियाणी विधी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, धुळे येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच शिंदखेडा, शिरपूर, साक्री येथील विविध स्वयंसेवी संघटनांच्या महिला पदाधिकारी मीनाताई भोसले, परदेशी मॅडम यांच्यासह सामाजिक व कायदेविषयक क्षेत्रात काम करणारे अनेक जण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मणिपूर घटनेच्या निषेधार्थ पिंपळनेरात बंद

### विविध आदिवासी संघटनांचा सहभाग, चोख पोलीस बंदोबस्त

**पिंपळनेर । प्रतिनिधी**




मणिपूर राज्यात महिलांना विवस्त्र करीत भररस्त्यावर त्यांची धींड काढण्यात आली. या घटनेची वाच्यता बर्याच दिवसानंतर झाली. यावरून आदिवासी बांधवांवर होणार्या अन्यायाला दाबण्याचा सरकार प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. मणिपूर घटनेसह अन्य घटना देखील लागोपाठ देशभरात घडत आहेत. यात आदिवासी बांधवांवर अन्याय केला जात आहे. याचा निषेध म्हणून साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथे विविध आदिवासी संघटनांनी कडकडीत बंदचे आवाहन केले होते.

या पार्श्वभूमीवर आज सकाळी शहरातील मुख्य मार्गांवरून मोर्चा काढण्यात आला. सकाळी ९ ते ९.३० वाजे दरम्यान या मोर्चाला शहरातील सामोडे चौफुलीवरील बैल मार्केट येथुन सुरूवात झाली. सदर मोर्चा गोपाल नगर, नाना चौक, मुख्य बाजारपेठ मार्गे पिंपळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती आवार येथे धडकला. या ठिकाणी उपस्थित आदिवासी संघटनांच्या पदाधिकार्यांनी आदिवासींवरील अत्याचाराविषयी माहिती देत सरकारचा निषेध केला. यावेळी शांतता भंग होवुन कुठलाही गालबोट लागू नये याकरीता एपीआय. श्रीकृष्ण पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवला. बंदला विविध संघटनांचा पाठींबा पुकारण्यात आलेल्या पिंपळनेर बंदला एका परिषद सचिव डोंगरभाऊ बागूल, महाराष्ट्र आदीवासी बचाव अभियान साक्री, धुळे चे गणेश गावीत, तानाजी बहिरम, एकलव्य युवक संग्राम परिषद, साक्री चे रविंद्र अहिरे, सरपंच देवा सोनवणे, जयश संघटनचे प्रमोद शिंदे, कामगार हमाल मापाडी संघटनेचे बाळु पवार, पिंपळनेर व्यापारी संघटनेचे दिलीप भदाणे, कोकणा,कुकणा, कोकणी संघटनेचे तुकाराम बहिरम, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी संघटना, महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेस प्रदेश सचिव संदीप भोये, बामसेफ चे गोकुळ दाणी, आदिवासी महासंघटना अध्यक्ष किरण बहिरम, शांताराम अहिरे, विकास अहिरे, गणेश कोकणी, अशोक सोनवणे, मनोहर बागूल, लखन पवार, किरण बागूल, ईश्वर ठाकरे, मंगला चौधरी, मालती ठाकरे, गोटू चौरे, जि.प.सदस्य चिपलीपाडा डॉ.नितीन सूर्यवंशी, काँग्रेस पक्ष युवा नेते साक्रीचे प्रविण चौरे यांनी जाहीर पाठींबा दिला.

# मणिपूर अत्याचार घटनेच्या निषेधार्थ सटाण्यात काढलेल्या मोर्चाला हिंसक वळण



**नाशिक । प्रतिनिधी**

मणिपूर येथील महिला अत्याचार प्रकरणाचे देशभरात पडसाद उमटत असून या अत्याचाराच्या निषेधार्थ विविध संघटनांकडून मोर्चे काढले जात आहे. या अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ जिल्ह्यातील सटाणा तालुक्यात काही संघटनांनी अर्धनग्न मोर्चा काढता होता. मात्र, मोर्चा संपल्यानंतर काही आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांवर दगडफेक केल्याने मोर्चाला हिंसक वळण लागल्याची घटना घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मणिपूर अत्याचाराच्या निषेधार्थ सटाण्यात वंचित बहुजन आघाडी आणि आदिवासी संघटनांकडून मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी मोर्चा संपल्यानंतर काही आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्ग रोखत वाहनांवर दगडफेक केली. या दगडफेकीत काही वाहनांचे नुकसान झाले असून अनेक जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, अचानक झालेल्या या दगडफेकीमुळे सटाण्यातील व्यापाऱ्यांनी तातडीने दुकाने बंद केली. या घटनेमुळे सटाणा शहरात तणाव निर्माण झाला असून मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच दगडफेक करणाऱ्या संशयितांचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

# सरकारमधील मनुवादी लोकांमुळे भिडेंना संरक्षण : आ.कुणाल पाटील

**धुळे । प्रतिनिधी**



राष्ट्रपिता महात्मा गांधीजींबद्दल अवमानकारक वक्तव्य करणार्या संभाजी भिडे नामक व्यक्तीला तत्काळ अटक करावी अन्यथा काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. दरम्यान सरकारमध्ये बसलेले जातीयवादी आणि मनुवादी लोक संभाजी भिडे यांना संरक्षण देत आहेत. भिडेंच्या अवमानकारक वक्तव्यामुळे देशातील प्रत्येक नागरीकास वेदना झाल्या आहे. म्हणून भिडेंना अटक करुन कठोर शासन झाले पाहिजे जेणेकरुन येणार्या काळात गांधीजींबद्दल अवमान करण्याचे धाडस कोणीही करणार नाही असा घणाघात आ.कुणाल पाटील यांनी केला.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल धुळे जिल्हा व शहर काँग्रेसच्यावतीने महाराष्ट्र काँग्रेस कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली गांधी पुतळ्याजवळ निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी महत्मा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते दुधाभिषेक करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी संभाजी भिडे यांचा निषेध करीत सरकारवर घणाघात केला. आ.पाटील म्हणाले कि, राष्ट्रपिता महात्मागांधी यांनी स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या आयुष्याची होळी केली. देशाला समता, बंधुत्वाचा मार्ग दाखवला, म.गांधींमुळे जगात भारताची ओळख आहे. त्यांच्या विचारांच्या आदर्शावर संपूर्ण देश चालत आहे. आणि त्याच राष्ट्रपित्यांचा अपमान करण्याचा दु:साहस संभाजी भिडे यांनी केले आहे. भिडेंच्या वक्तव्यामुळे देशातील प्रत्येक नागरीकास वेदना झाल्या आहेत. म्हणून संभाजी भिडे यांना तत्काळ अटक करुन त्यांना कठोर शासन झाले पाहिजे, जेणेकरुन येणार्या काळात गांधीजींबद्दल अपमानास्पद वक्तव्य करण्याचे धाडस कोणीच करणार नाही. आणि संभाजी भिडे यांना सरकारने अटक केली नाही तर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा यावेळी आ.कुणाल पाटील यांनी दिला. निषेध आंदोलनात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शामकांत सनेर, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ.अनिल भामरे, ज्येष्ठ नेते रमेश श्रीखंडे, साबीर खान,पिंताबर महाले, खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील, माजी पं.स.सभापती भगवान गर्दे,बाजार समितीचे संचालक एन.डी. पाटील, तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष अशोक सुडके, बाजार समितीचे उपसभापती योगेश पाटील पं.स.चे माजी सदस्य पंढरीनाथ पाटील, बाजार समितीचे माजी सभापती गुलाबराव पाटील, आदी सहभागी झाले होते.

# नाकापेक्षा मोती जड : नाटकाचा प्रयोग सुरु असताना नाट्यगृहाची बत्ती गुल

धुळे शहरातील नाट्यगृहातील गैरसुविधांचे नाटक सुरु आसनात कलाकार व प्रेक्षकाच्या समोर नाट्यगृहांचे वाभाडे निघाले. यामुळे धुळे शहरचे नाव नाट्यक्षेत्रामध्ये बदनाम झाले. याची जबाबदारी आता कोणीही घ्यायाल तयार नाही. परंतु नाट्यगृहाचे वास्तव पाहिले तर चित्र विदारक आहे. नाट्यगृहापासून ५ वर्षात मिळणारे उत्पन्न किती याचा देखील विचार झाला पाहिजे. मात्र नाकापेक्षा मोती जड, अशीच परिस्थिती आज नाट्यगृहाची झाली आहे.

मनपाच्या दुर्लक्षामुळे नाट्यक्षेतात बदनामी आहे धुळे शहराची,त्यामुळे जबाबदारी झटकण्यापेक्षा संबंधितांनी आता आत्मपरिक्षण करण्याची वेळ आली आहे. नाट्यगृहात प्रयोग सुरु असतानाच लाइट बंद पडल्याने कलाकारणाचा हिरमोड झाला. त्यामुळे नागरिकांमध्ये आवाज पोचत नव्हता. सुरुवातीला अत्यन्त सुंदर आणि सुशोभित असलेले नाट्यगृह काही काळानंतर अत्यन्त वाईट अवस्थेत आहे. सर्वांत मोठे नाट्यगृह म्हणून शहरातील राजश्री छत्रपती शाहू महाराज नाट्य नाट्यगृहाकडे पाहिले जाते. नादुरुस्त एसी, अस्वच्छता आणि कोणतीही सुरक्षा नाही, अशी दुर्दशा या नाट्यगृहाची झाली आहे. खुर्च्या देखील तुटलेल्या अवस्थेत आहेत. ज्या वास्तुमधे जावंसंच वाटत नाही तिथे परफॉर्म करायची इच्छा होणार नाही आणि प्रेक्षक तरी का येतील? वास्तु किती अवाढव्य पेक्षा कलाकार आणि प्रेक्षक यांच्यासाठी किती सोईची हे महत्त्वाचं आहे. नाट्यगृहाचे भाडे हा खर्चिक मुद्दा असताना ते भरूनही अनेकदा सुविधा मिळत नाहीत. त्यासह भाड्याच्या रकमेव्यतिरिक्त इतर बाबींसाठीही निर्मात्यांना खर्च करावा लागत असल्याने भाडे आकारतानाच त्या दर्जाच्या सुविधाही दिल्या जाव्यात, असेही आयोजकांकडून सांगण्यात येते.

#### कलाकारांसह प्रेक्षकांची गैरसोय

**नाटकासाठी नवनवीन कलाकार अतोनात मेहनत घेऊन स्वत:च्या खिशातून किंवा अन्य संस्थांमार्फत निधी संकलन करतात आणि नाटक सादर करून रसिक प्रेक्षकांना आनंद देत असतात; पण या रंगकर्मींना सादरीकरणासाठी मोठं व्यासपीठ अल्पदरात मिळत नाही. त्यामुळे तिकिटाचे दर जास्त ठेवून चालत नाही. आणि त्यात नाट्यगृहाच्या दुरवस्थेला देखील कलाकारांना सामोरे जावे लागते आहे. कलाकारांसह सामान्य प्रेक्षकांची प्रचंड गैरसोय होते.**



#### प्रयोगात एक-एक सेकंदही महत्त्वाचा

**नाटकांसाठी कलाकार अनेक रात्र मेहनत घेतो. आपली कला सादर करण्यासाठी अनेक वर्षे दिवसाची रात्र करतो. आपली कला प्रेक्षकांच्या पर्यंत पोचवण्यासाठी प्रयत्न करतो. नाटकांच्या प्रयोगात एका डायलॉग महत्वाचा असतो. म्हणजेच नाटकांच्या प्रयोगातील एक-एक सेकंदही खुप म्हत्वाचा असतो. पण नाटकाचा प्रयोग सुरू असताना मध्येच वीज बंद होणे, व माईक बंद होणे. नाट्यक्षेतात धुळे शहराची बदनामी आहे. बाहेरचे कलाकार शहराचे काय नाव घेऊन गेले असतील. याचा विचार न केलेला चांगले आहे.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

# माझा रोज एक-एक माणूस फोडत जा, शिवसैनिक पेटून उठतात : उद्धव ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

माझे भाजप आणि शिंदे गटाला एकच आवाहन आहे की, माझा रोज एक-एक माणूस फोडत जा. त्यामुळे माझे शिवसैनिक ताजेतवाने होऊन पेटून उठतात, असा टोला ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी लगावला. मुंबईच्या सायनमधील ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आज उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर भेट घेतली. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरेंनी भाजप व शिंदे गटावर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसेना म्हणजे शिवभोजन आहे. येथे काही जण तृप्त होऊन दुसरीकडे गेले आहेत. मात्र, हे शिवभोजन कधीही संपू शकत नाही. २००७मध्येही मुंबई महापालिकेत पुन्हा शिवसेना सत्तेत येणार की नाही? अशी शंका उपस्थित केली जात होती. मात्र, आपण त्या निवडणुकीत विजय मिळवला होता. आता पुन्हा त्यापेक्षा मोठा विजय शिवसेनेला मुंबई पालिका निवडणुकीत मिळेल रोज शिवसेनेतून एक-एक माणूस फोडला जात आहे. पक्ष सोडून गेलेल्यांना माझा जय महाराष्ट्र. तरीही शिवसेना संपत नाही. शिवसेनेत ओघ आता वाढतोच आहे. शिवसेना संपत का नाही? असा प्रश्न आता विरोधकांना पडला असेल.

## 'कलंकित' लोकप्रतिनिधी

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना निवडणुकी-पासून कायद्याने रोखता येणार नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानेच दिला आहे. कायद्यातच तशी तरतूद नसल्याने न्यायव्यवस्थेचेही हात बांधले गेले आहेत.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स(एडीआर)चा ताजा अहवाल अलीकडेच जाहीर झाला. देशाच्या राजकारणाची आणि राजकीय नेत्यांची पातळी किती घसरली आहे, यावर त्यातून प्रकाशझोत पडतो. ज्यांच्याकडून देशाच्या भवितव्याची चिंता अपेक्षित करतो, त्या राजकीय नेत्यांच्या 'कर्तबगारी'वर हा अहवाल झणझणीत अंजन घालतो. देशातील ४४ टक्के आमदारांवर गुन्हे दाखल असून, त्यापैकी बहुसंख्य आमदारांवर महिलांवरील अत्याचारासारखे गंभीर गुन्हे आहेत, ही माहिती त्यांनीच निवडणूक आयोगाला दिलेल्या स्वयंघोषित प्रतिज्ञापत्रातून दिली आहे. एडीआर आणि नॅशनल इलेक्शन वॉच या दोन संस्थांच्या वतीने आमदारांच्या प्रतिज्ञापत्रांचा अभ्यास करून मांडलेले निष्कर्ष धक्कादायक आहेत. महाराष्ट्रातील २८४ आमदारांपैकी १७५ आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ११४ आमदारांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. देशभरातील ४०३३ आमदारांपैकी ११३६ म्हणजे २८ टक्के आमदारांवर खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. केरळमध्ये ७० टक्के आमदारांच्या विरोधात, तर बिहारमध्ये ६७ टक्के आमदारांविरोधात गुन्हे असल्याचे हा अहवाल सांगतो. आपण निवडलेले लोकप्रतिनिधी किती श्रीमंत आहेत हेदेखील हा अहवाल स्पष्ट करतो. प्रत्येक आमदार सरासरी १३.६३ कोटींचा मालक आहे. सर्वाधिक श्रीमंत आमदार कर्नाटकात आहेत. त्या राज्यात २२३ आमदारांची सरासरी मालमत्ता ६४.२९ कोटी आहे. त्या खालोखाल आंध्रचा क्रमांक लागतो. तेथे १७४ आमदारांची सरासरी संपत्ती २८.२४ कोटी आहे, तर महाराष्ट्रातील २८४ आमदारांची सरासरी संपत्ती २३.५१ कोटी आहे. त्रिपुरामध्ये 'गरीब' आमदार दिसतात. तेथे ५९ आमदारांची सरासरी संपत्ती १.५४ कोटी इतकी आहे. श्रीमंत 'आमदारां'मध्ये २ टक्के(८८) आमदार अब्जाधीश आहेत. त्यांच्याकडे १०० कोटीपेक्षा अधिक संपत्ती आहे. नऊ वर्षांपूर्वी 'न खाऊँगा, न खाने दूँगा' अशी घोषणा करून सत्तेवर आलेल्या पंतप्रधान मोदी यांनाही देशातील भ्रष्ट आणि गुन्हेगारीचा शिक्का असलेल्या लोकप्रतिनिधींना रोखता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे. कलंकित प्रतिनिधी केवळ विरोधी पक्षातच नव्हे, तर सत्ताधारी भाजपमध्येही आढळतात. निवडून येण्याची क्षमता हाच एकमेव निकष उमेदवारी देताना लावला जात असल्याने आणि सत्तेसाठी संख्याबळालाच महत्त्व असल्याने राजकीय पक्षांच्याही उमेदवार निवडीतल्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याची ओरड होत असली तरी असे उमेदवार निवडून देण्यास सर्वसामान्य मतदारच कारणीभूत ठरतो. राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्याची जबाबदारी राजकीय पक्षांची असली तरी सत्तेसाठी राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते उमेदवार ठरवताना नैतिक मूल्यांकडे दुर्लक्षच करतात. देशातील न्यायव्यवस्था अशा भ्रष्ट आणि कलंकित नेत्यांना आवर घालू शकते; पण कायद्याच्या मर्यादा लक्षात घेता न्यायालयांकडूनही त्यांना रोखता येणे अशक्य आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी देऊ नये यासाठी राजकीय पक्षांवर कोणतीही बंधने न्यायालये घालू शकत नाहीत. त्यामुळेच कोणाला निवडून द्यायचे आणि कोणाला नाही याचे तारतम्य मतदारांनीच बाळगायला हवे. आपण निवडून देतो तो कसा आहे, त्याची पार्श्वभूमी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी मतदान केंद्रावर उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा उल्लेख असलेले फलक लावण्याची किंवा वृत्तपत्रांद्वारे ती जाहीर करण्याची सक्ती असली तरी त्यातून किती प्रबोधन झाले ? ईडी, सीबीआय, प्राप्तिकर खाते यांसारख्या तपास यंत्रणांच्या कारवाया सुरू असतात. मात्र, या यंत्रणाही केंद्र सरकारच्याच दावणीला बांधलेल्या असल्याने त्यांचाही गैरवापर होतो. अशा कारवाया विरोधी पक्षातील लोकांना आपल्या पक्षात घेण्याचे माध्यम म्हणून वापरल्या जातात. त्यामुळेच आधी सुरू असलेल्या तपास यंत्रणांच्या कारवाया सत्ताधारी पक्षात ते नेते येताच थांबतात. मतदारांची जागरुकता, प्रसिद्धी माध्यमांचा अंकुश आणि न्यायालयीन कारवाईचा बडगा अशा उपायांनीच राजकारणातील गुन्हेगारीला चाप बसू शकतो. राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्यास कठोर कायदा आणण्याची गरज असली तरी कोणत्याच राजकीय पक्षाची तशी मानसिकता नाही, हेही खरेच.

## प्राचार्य एन आर भदाणे

प्राचार्य नागेश्वर राघो भदाणे सरांचा जन्म साक्री तालुक्यातील सामोडे गावी शेतकरी कुटुंबात १९४० साली झाला. पिंपळनेरच्या शाळेत ते दहावीच्या परीक्षेला पहिले आले. बारावीच्या परीक्षेला मेडिकल ला प्रवेशा इतके मार्क मिळूनही त्यांनी प्रताप कॉलेज अमळनेरला बी.एससी सायन्सला प्रवेश घेतला. बी.एससी ला ते प्रताप कॉलेजला पहिले आले.

त्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून केमेस्ट्री विषयात एम एस सी केले आणि नॅशनल केमिकल लॅबोरेटरी येथे संशोधन करत पुणे विद्यापीठातून पीएचडी केले. त्यानंतर सर धुळ्याच्या एस एस व्ही पी एस संस्थेच्या सायन्स कॉलेजला १९६८ साली प्राध्यापक म्हणून रुजू झाले.त्याच काळात त्यांना अमेरिकेत पोस्ट डॉक्टरेट शिक्षणासाठी फेलोशिप मिळाली. अमेरिकेत पाच वर्षे संशोधन करून पोस्ट डॉक्टरेट झाले . अमेरिकेतील शिक्षणानंतर सर भारतात परतले. भारतात परतण्यामागे कौटुंबिक जबाबदारी व आई-वडिलांचा आग्रह कारणीभूत ठरला. १९७८ साली, प्राचार्य भदाणे सर, त्यांचे मित्र डॉ. दौलतराव आहेर यांच्या आग्रहाखातर नाशिकच्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या केटीएचएम कॉलेजला प्राचार्य पदी रुजू झाले, खरेतर १९७८ साली त्यांनी प्राचार्य पदाकरता अर्ज दिलेला नव्हता व ते मुलाखतीसही हजर नव्हते परंतु अतिशय गुणग्राहक बाबुराव ठाकरेंनी त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर लगेच त्याच दिवशी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले व २००० साली सेवानिवृत्त झाले.

विद्यार्थी दशेपासून डॉ दौलतराव आहेराशी त्यांची असलेली मैत्री शेवटपर्यंत टिकली. या दोन्ही मित्रांना आयुष्याची जी जी पदे मिळाली, त्या पदावर काम करताना त्यांनी बहुजन हिताच्या दृष्टिकोन ठेवून संपूर्ण महाराष्ट्राला त्या त्या क्षेत्रासाठी आदर्शवत वाटचालीकडे नेले. प्राचार्य भदाणे सरांची प्राचार्य पदाची कारकीर्द खूप उल्लेखनीय राहिली , सरांनी पोस्ट डॉक्टरेट करता अमेरिकेत प्रदीर्घकाळ वास्तव्य केल्यामुळे तेथील शैक्षणिक पद्धती, संशोधन पद्धती, विद्यार्थी विकासाची पद्धती याचा उपयोग त्यांनी आपल्या महाविद्यालयात केला. सरांच्या काळात कॉलेजचा फार मोठा विस्तार झाला. प्राचार्य भदाणे सरांनी चार्ज घेतला तेव्हा कला व वाणिज्य शाखा सुरू होत्या व विज्ञान शाखेला नुकतीच सुरुवात झाली होती, विद्यार्थी संख्या पंधराशेच्या आसपास होती. सर निवृत्त झाले तेव्हा कॉलेजचा फार मोठा विस्तार होऊन विद्यार्थी संख्या १४ हजारापर्यंत पोहोचली व ते कॉलेज महाराष्ट्रातील सर्वात मोठे कॉलेज झाले.

सरांच्या काळात अनेक इमारती बांधल्या गेल्या ,वेगवेगळी डिपार्टमेंट्स सुरू झाली.पोस्ट ग्रॅज्युएट डिपार्टमेंट सुरू झाले.पी एच डी संशोधन केंद्र मिळवून अनेक विद्यार्थ्यांची सोय झाली. त्याच काळात बहुजन समाजातील अतिशय कर्तबगार डॉ वसंतराव पवार यांचा मराठा विद्या प्रसारक संस्थेत प्रवेश झाला. डॉ वसंतराव पवारांच्या अतिशय गुणग्राहक नेतृत्वाला प्राचार्य भदाणे सरांची साथ मिळाली. त्यामुळे संस्थेची शैक्षणिक प्रगतीत घोडदौड सुरू झाली. संस्थेत सर खूप शिस्तप्रिय प्राचार्य म्हणून ओळखले जात.आता तर केटीएचएम कॉलेज हे सर्वाधिक विद्यार्थी संख्या असलेले महाराष्ट्रातील सर्वात मोठे कॉलेज आहे . केटीएचएम कॉलेजला त्याकाळी संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातून मुख्यतः ग्रामीण भागातून शिक्षणाकरिता खूप मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येत असत.बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम कॉलेजने केले आहे. सरांच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थ्यांनी विलक्षण शैक्षणिक कामगिरी केली. प्राचार्य भदाणे सरांनी तळागाळातील विद्यार्थ्यांना आधार देऊन, मार्गदर्शन करून त्यांना उच्च पदावर पोहोचवले.

त्याकरिता व्यवस्थापनाबरोबर अतिशय चांगला सुसंवाद ठेवून संस्थेची प्रगती केली. कर्मवीर बाबुराव ठाकरेंना अतिजलद व अचूक निर्णय घेण्याची ईश्र्वरीय देणगी लाभली होती. प्राचार्य भदानेंनी त्याचे आदर्श कर्मवीर ठाकरेंच्या शिकवणीतून ताठ मान, ताठ पाठीचा कणा, तत्वांशी कधीही तडजोड न करण्याचे गुण घेतले. आपल्या सहकाऱ्यांना उत्तम शैक्षणिक कामासाठी प्रोत्साहित केले, सहकाऱ्यांच्या मदतीने शिस्तबद्ध वातावरणात संस्थेची प्रगती केली. हजारो विद्यार्थी संख्या असलेल्या केटीएम कॉलेजला सर प्राचार्य पदी असताना ,कॉलेज सुरू असताना ,एक सुद्धा विद्यार्थी पटांगणात फिरताना, वेळ वाया घालवताना दिसायचा नाही. त्यांच्या या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या कार्यासाठी विद्यार्थी ,पालक, त्यांचे सहकारी ,व्यवस्थापन यांनी केलेल्या सहकार्यामुळे संपूर्ण एक पिढी उच्च शैक्षणिक प्रगती करू शकली. प्राचार्य भदाणे सरांनी गुणग्राहकता ठेवून योग्य व्यक्तींचा योग्य ठिकाणी सन्मानपूर्वक वापर करून कार्यसिद्धी साधली. सरांनी आपल्या कौटुंबिक जबाबदारी सांभाळताना आपल्या परिचित, नातेवाईक विद्यार्थ्यांना आपल्या घरी शिक्षणाकरता ठेवले त्यामुळे अनेक नातेवाईकांची मुले शिकू शकली .अनेक विद्यार्थ्यांची नाशिक मध्ये राहण्याची सोय करून त्यांचे शिक्षण योग्य पद्धतीने होईल याकडे सरांनी लक्ष दिले .



शब्द संवाद
**प्राचार्य प्रशांत पाटील**
**(नाशिक) मो.९५११८५९९३९**

१९९१ ला नाशिकला यशवंतराव चव्हाण विद्यापीठ स्थापन झाले.त्या काळात कुलगुरू राम ताकवले सरांच्या आग्रहाखातर, सर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात डायरेक्टर झाले. कुलगुरू राम ताकवले हे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती करिता पुणे विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये जे प्रयोग केले ,त्या प्रयोगांना अतिशय समर्थ साथ देत त्याची अंमलबजावणी प्राचार्य भदाणे यांनी आपल्या महाविद्यालयात केली .त्यामुळे पुणे विद्यापीठाची शैक्षणिक प्रगती अतिशय मोलाची पार पडली. प्राचार्य भदाणे सर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात रुजू झाले त्या काळात विद्यापीठाची नुकतीच सुरुवात होती. सरांनी प्रयत्नपूर्वक संपूर्ण महाराष्ट्रात प्रवास करून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात मुक्त विद्यापीठाचे केंद्रे स्थापन करण्याकरता प्रयत्न केले. त्यामुळे शालाबाह्य विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली .अनेक नोकरी करणारे लोक ,शेतकरी, कामकरी लोकांना आपले शिक्षण मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामुळे पूर्ण करता आले .आज यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ भारतातील प्रमुख मुक्त विद्यापीठातील एक विद्यापीठ झाले आहे.

२००० साली निवृत्त झाल्यानंतर सर महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठात कुलगुरू डोणगावकर सर यांच्या आग्रहाखातर रजिस्टर पदी रुजू झाले . तेव्हा आरोग्य विद्यापीठाची नुकतीच सुरुवात होती. कुलगुरू ,रजिस्टार व सहकाऱ्यांच्या मदतीने या काळात प्रशासकीय यंत्रणा प्रस्थापित करण्याचे काम झाले.या ठिकाणी दोन वर्षे काम केल्यानंतर त्यांनी डी वाय पाटील मेडिकल कॉलेज, अभिमत विद्यापीठला तीन वर्ष रजिस्टार व नंतर कन्सल्टंट म्हणून काम केले . प्राचार्य भदाणे डी वाय पाटील मेडिकल कॉलेजला , नुकताच अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झालेल्या ठिकाणी, रजिस्टार म्हणून जॉईन झाले तेव्हा या अभिमत विद्यापीठाला परवानगी मिळाली होती व नंतरच्या काळात अभिमत विद्यापीठाची प्रशासकीय घडी बसवण्याचे काम सरांनी केले. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, आरोग्य विद्यापीठ व डी वाय पाटील अभिमत विद्यापीठ या तीन विद्यापीठाच्या अगदी सुरुवातीच्या काळात सरांनी संपूर्ण यंत्रणा कार्यरत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान दिले. सरांना दीर्घकाळ अनेक ठिकाणी काम करता आले.

या सर्व काळात त्यांनी ज्या अति उत्कृष्ट कामाच्या फुटप्रिंट उमटवल्या त्या शैक्षणिक क्षेत्रासाठी आदर्शवत ठरल्या .नाशिक जिल्ह्यातील १९७० नंतर जी शैक्षणिक प्रगती झाली. त्या सर्व प्रगतीत वेगवेगळी कॉलेज उभारणे, त्यांच्या उभारणीला सहाय्य करणे, परवानगी मिळवून देणे याकरिता सरांनी पुणे विद्यापीठाच्या वेगवेगळ्या कमिटींवर काम करत संपूर्ण नाशिक जिल्ह्यासहित उत्तर महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांना मदत केली. महाराष्ट्र एसएससी बोर्डाला काम करत अभ्यासक्रम योग्य तऱ्हेने राहील याकरता प्रयत्न केले . सरांचे अनेक रिसर्च पेपर प्रसिद्ध झाले, त्यांना सार्वजनिक वाचनालयाचा आदर्श शिक्षक पुरस्कार सहित अनेक पुरस्कार मिळाले.

सरांच्या दोन कन्या अमेरिकेत आहेत. पैकी एक वैद्यकीय व्यवसाय करते. मुलगा नाशिकमध्ये सिव्हिल इंजिनिअर आहे. त्यांच्या सुविद्या पत्नीची साथ त्यांना आयुष्यभर लाभली आहे त्यामुळे ते संपूर्ण आयुष्यात आपल्या कुटुंबाला, नातेवायकाना आधार देऊ शकले. सरांनी आपले आरोग्य अतिशय उत्तम राखले आहे. आजही दररोज ते सकाळी पाच सहा किलोमीटर चालण्याचा व्यायाम करतात. आपल्या उच्च दर्जाच्या कार्यपद्धतीमुळे, गुणग्राहकतेमुळे सतत शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी उन्नतीच्या नवीन नवीन प्रयोगामुळे आपल्या कामाची अतुलनीय छाप सोडणाऱ्या प्राचार्य भदाणे सरांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## ढिगाऱ्याखालच्या किंकाळ्या अन् वेदना!

त्यांनी सांगितलेली त्या भागात पसरणारी दुर्गंधी, वाहन जाण्याची व्यवस्था नसणे आणि काम करणारी शासकीय यंत्रणाही हतबल होऊन थकते. जेव्हा काही उपयोगच होऊ शकत नाही, हे स्पष्ट होते तेव्हा मग अशा दुर्दैवी घटनेत काम थांबविणे हाच पर्याय उरतो. इर्शाळवाडीतील दुर्घटनेत २२ छोटी मुलं आहेत. खरंतर या मुलांचे पालन-पोषण आणि त्यांचं भविष्य हा फार मोठा चिंतेचा विषय ठरतो. सरकार म्हणून मंत्री उत्तर देतात. 'कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही, शासन खंबीरपणे पाठीशी उभे राहील' हे आश्वासन काही वर्षांनंतर हवेत विरून जाते. बिचारी निष्पाप अनाथ झालेले कोवळे जीव फार आशाळभूतपणे पाहत असतात. सारेच हतबल होऊन जातात. इर्शाळवाडीतील या २२ छोट्या बालकांना न्याय मिळाला पाहिजे. हा राजकीय नव्हे; तर सामाजिक प्रश्न आहे. कोवळ्या जीवांच्या भवितव्याचा हा विषय आहे. सरकार संवेदनशील आहे, असे म्हटले जात असेल तर सरकारची संवेदनशीलता इर्शाळवाडीच्या या २२ बालकांचे भविष्य घडविले पाहिजे. नाही तर सरकारची योजना आणि संवेदनशीलता फक्त कागदावरच राहील. ती कृतीत उतरली पाहिजे.

चिपळूण तिवरेच धरण फुटलं त्यावेळी २३ जणांचा मृत्यू झाला. मृतांच्या नातेवाइकांना घर बांधून देण्याचा निर्णय तेव्हा शासनाने जाहीर केला. सिडको घर बांधून देणार, असे सांगितले गेले. यातल्या अनेकांच्या घराची एक वीटही बसलेली नाही. या अशा कामांमुळे शासनावर लोक विश्वास ठेवत नाहीत. आश्वासनांवर लोकांचा आता विश्वास नाही. त्यांना प्रत्यक्ष काम हवं असते. महाराष्ट्राच्या कोकणातील या डोंगर कोसळण्याच्या घटनेबाबत सरकार आणि समाजाने गंभीर व्हायला हवे. हे डोंगराखाली का येतात? त्यावर उपाययोजना काय करता येईल? हे पाहिले पाहिजे. बऱ्याचवेळी ग्रामस्थ स्थलांतराला विरोध करतात, हे खरं आहे; परंतु त्यामागे वर्षानुवर्षे त्या मातीशी, घराशी एक जोडलेलं नातं असतं. अनेक पिढ्या त्याच प्रतिकुल परिस्थितीत त्या परिसरात वाढलेल्या असतात आणि मग घर, गाव सोडवत नाही. येणारी संकटं झेलत, प्रतिकूल परिस्थितीतही लोक तिथेच राहतात. बरं गावं, घर शेती-वाडी तरी कोणाच्या विश्वासावर, भरोशावर सोडावं, यामुळे डोंगर घरावर कोसळू शकतो, हे दिसत असतानाही लोक ग्रामीण भागात राहात असतात. डोंगराखाली राहात असतात. ही बाबही समजून घेतली पाहिजे. कारण अशी एखादी दुर्घटना घडली की शासन, प्रशासन आणि समाजमाध्यमांवर ग्रामीण भागात राहणाऱ्या ग्रामस्थांच्या राहण्याची चर्चा होते. अशा डोंगराळ भागात राहणाऱ्यांच्या भावना, त्यांची मजबुरी समजून घेतली तरीही त्यातील वास्तव आपणाला समजून येऊ शकते. शासनाने सामान्य लोक विश्वास ठेवतील, अशा पद्धतीने पुनर्वसन करावे. अशा दुर्दैवी घटना तर घडूच नयेत; परंतु शेवटी हे कोणाच्याच हाती नाही. एवढं मात्र खरे! **समाप्त:**

**- संतोष वायंगणकर**

## शब्दकोडे-१३५



आडवे शब्द

१. उपद्रवी बडबड (ला.) ५. गोष्ट ७. गणितातील अधिक क्रिया ९. देवाचे देहधारी रूप ११.वेदनेने ओरडणे १२. मर्कट १४. वाळवंट १६. शेंगेवरील आवरण १७. गूढ, अवघड १९. अर्थसंकल्प २०. श्रीकृष्णाचे लहानपणाचे राहण्याचे ठिकाण २२. जेव्हा २४. फरक, तफावत २५. बैलगाडीचा एक प्रकार २६. वन, रान २७. पोट २८. शेगावचा प्रसिद्ध पदार्थ ३०. झीज, नुकसान ३१. कुटुंबकबिला ३२. धपाटा ३३. पाडाव, पडणे ३५. पुन्हा ३७. विहीर ३८. फेरफटका ४०. चौथा भाग ४२. तर्क, अंदाज ४४. जहाजांचा मुक्काम ४६. जास्तीचे ४७. रेश्मी जाडसर कापडप्रकार ४९. सुकामेव्यातील काळी द्राक्षे ५१. पळसाचा डिंक ५२. बंदूक (इंग्रजी) ५२अ. बिल्ला ५४. तापापूर्वीचे शहारे ५७. क्वचित ५८. कडक स्वभावाची स्त्री ६१. हात ६२. मवाळ धोरण ६५. सोने ६६. समुद्रकिनारा ६८. बाण ७०. च्या बद्दल ७२. व्रत ७५. अग्नी, ज्वाला ७६. संध्याकाळ ७८. तत्काळ, जागच्या जागी ७९. निश्चयी, दृढ मनाचा ८०. कटी

उभे शब्द

१. लेखनात आढळणारा पक्ष्याचा पाय २. वळसा- शिस्त ३. गेरु ४. सुबक (अक्षर) ६. काळजी ७. न घाबरणारा ८. तीव्र रेचक ९. गबाळ १०. सूर्याचे एक नाव १३. वटवट १५. कपडालत्ता १८. मनोहरी दृश्य १९. वर-वधूमधील पडदा २१. मुद्दाम काढलेली खोडी २३. धर्मार्थ देणे २४. आत (हिंदी) २५. प्रयत्न २६. दुष्ट बेत, कपट २९. पद्धत ३४. पुरुष ३६. सम शीतोष्ण ३७. विश्रांती ३९. स्क्रू ड्रायव्हरला मराठी शब्द ४०. स्वामी स्वरुपानंदाच्या समाधीचे गाव ४१. देवाण घेवाण ४३. उजाड ४४. दुर्दशा ४५. टपाल ४६. जागृती ४८. बेचव ४८अ. दात ५०. तोटा ५३. व्यायाम ५५. पवित्र कुराणातील वचन ५६. प्यारेलाल यांच्या जोडीचे संगीतकार ५९. अनेकांकडून कर्ज घेतलेला ६०. एक पाताळ ६१. हिंदीत कर्म ६३. आवाज, गोंगाट ६४. परमेश्वर ६७. आवरणाचा छोटा तुकडा ६९. धोबी ७१. ताकद ७३. स्वच्छ ७४. स्त्रियांचा दंडातील दागिना ७६. भोळा ७७. धातूचा धागा, कलाबतू

### शब्दकोडे १३४ चे उत्तर

**आडवे उत्तर -** १.पारावार ४.ममता ६.सवडीनुसार १०.राज ११.कपाल १२.वसाहत १४.साग १६.कुसुम १८.वरदान २०.नवसाचा २२.सुमार २३.पटकन २४.अदा २५.नवागत २७.घर २८.सर ३०.रस ३२.चारा ३३.गाव ३४.संपादकीय ३६.पालवी ३८.परतपरत ३९.कोट ४०.परवा ४१.समर्थ ४२.नराधम ४४.दवा ४५.तरुण ४८.लव ५०.नरमाई ५१.अजगर ५३.मासला ५५.नांगी ५६.भाव ५७.पाव ५८.जवळ ६०.बगीचा ६२.यमराज ६४.रथ ६६.रवरव ६८.जनगणमन ७१.टका ७३.नाग ७४.अथक ७६.नाखवा ७७.कालहरण ७९.रणगाडा ८०.ललना ८१.कबर

**उभे उत्तर -** १.पारा २.राजकुमार ३.रकम ४.मळवट ५.तावदान ६.सह ७.वतनदार ८.नुकसान ९.रसा १३.सान १५.गवत १७.सुर १९.रकमपात २१.चावाचावी २२.सुघड २३.पर २६.गरा २८.सवत २९.बाकी ३१.सपाटून ३३.गारवा ३४.संरक्षण ३५.यथार्थ ३७.पोट ३८.परवानगी ३९.कोमल ४०.पद ४१.सरोज ४३.राजस ४५.तमासगीर ४६.रूई ४९.वर्दळ ५१.अवयव ५२.गजराज ५३.मावळण ५४.लाज ५५.नांगर ५९.वसा ६१.चावट ६३.जनगणना ६५.थरथर ६७.रकाना ६९.मतलब ७०.संगणक ७२.सवाल ७३.नार ७५.कण ७७.काक ७८.हर

## जखमा जुन्याच ;परंतु इर्शाळवाडी सारखे नवीन-नवीन घाव चिंताजनक

रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी सारख्या अनेक दुःखद घटना पुर्वीही झाल्यात परंतु कोणतीही सरकार त्यावर फुंकर घालू शकले नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.याचे दुःख राज्याच्या १३ कोटी जनतेला अवश्य होत आहे.इर्शाळवाडीची घटना अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी होती.दिनांक २० जुलै २०२३ ला कोसळत्या धुव्वाधार पावसात आणि गार वाऱ्यात ४९ कुटुंब गाढ झोपेत होते तेवढ्यात मातीचा मोठा ढिगारा डोंगरावरून घरंगळत खाली आला आणि त्याने अर्धावरून अधिक गाव गिळंकृत केले यात आतापर्यंत २९ जणांचा मृत्यू झाला असून ५२ ग्रामस्थ अजुनही बेपत्ता असल्याचे सांगितले जाते.यापुर्वीही अशाच भयावह घटना आपण उघड्या डोळ्यांनी पहिल्यात यावर सरकारने तात्पुरती उपाययोजना केली व शांत बसली. परंतु पुन्हा-पुन्हा त्याच दुःख घटना उद्भवतात व जखमा करून जातात यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.राज्यात अजुनही असे अनेक क्षेत्र आहे की त्याठिकाणी मुलभूत सुविधांचा अभाव आहे. पावसाचे तांडव,काळीज चिरणाऱ्या दुर्घटना आणि मृतदेहाचे ढिगारे हे अलीकडे रायगड जिल्ह्यातील आणि पावसाळ्याचे जणू नवे समीकरण तयार झाले की काय असे वाटते.यापुर्वी दासगाव, सावित्री पूल, तळीये, तारिक गार्डन या जुन्या जखमा अद्याप भरून निघालेल्या नसतानाच ईर्शाळवाडीची भयावह घटना घडली.२६ जुलै २००५ ला दासगाव,जुई, कोंडीवते व रोहन या गावात दरडी कोसळून १९४ जणांचा मृत्यू झाला होता,२ ऑगस्ट २०१६ ला सावित्री नदीवरील पूल कोसळून ४० जणांचा बळी गेला,२५ ऑगस्ट २०२० ला महाडमधील तारिक गार्डन ही पाच मजली इमारत कोसळून १६ जण मृत्युमुखी पावले,२२ जुलै २०२१ ला पोलादपूर तालुक्यातील सुतारवाडी येथे भूस्खलन होऊन दरडीखाली ६ जणांचा मृत्यू झाला,याच दिवशी २२ जुलै २०२१ ला महाड तालुक्यातील तळीये हे गाव डोंगराखाली गडप झाले आणि ८७ लोकांचा जीव गेला.ह्या सर्व घटना होऊन गेल्या तरी प्रशासन व सरकायला वेळीच जाग येत नाही व वेळेवर तारांबळ उडते आणि धावपळ मचते.त्यामुळेच पुन्हा-पुन्हा जुन्या जखमा ताज्या होतांना दिसतात व ईर्शाळवाडी सारखा जब्बर घाव सहन करावा लागतो हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल. राज्यातील दरड कोसळण्याच्या घटना मुख्यत्वेकरून वृक्षतोडीमुळे होत आहे ही बाब सरकारला माहित असुन सुद्धा राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षकटाई सपाट्याने सुरू असल्याचे आपल्याला दिसून येते. **क्रमशः**

**-रमेश कृष्णराव लांजेवार**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय -** फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय -** शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय -** बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# ऑगस्ट महिन्यात रसिकांसाठी लोकचित्र संगम कलामहोत्सव

## मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थितीत चित्रप्रदर्शनाचे उदघाट्न

**नाशिक । प्रतिनिधी**






वारली आर्ट फाउंडेशनतर्फे लोकचित्र संगम कलामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १ ते ३१ ऑगस्ट दरम्यान हा अनोखा उपक्रम नाशिकरोडच्या पु. ना. गाडगीळ शोरूममधील कलादालनात होणार आहे. त्यात भारतातील विविध वैशिष्ट्यपूर्ण लोकचित्र शैलीतील आकर्षक कलाकृतींचा समावेश असेल. एकूण २५ कलाकार सहभागी होणार असून प्रत्येक आठवड्याला ६ कलाकार त्यांची चित्रे प्रदर्शीत करतील. संकल्पना व संयोजन पत्रकार व वारली चित्रशैली अभ्यासक संजय देवधर यांचे आहे.

दि. १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता या लोकचित्र संगम कलामहोत्सवाचा उदघाट्न समारंभ होणार आहे. सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व ऋतुरंग परिवाराचे प्रमुख विजय संकलेचा, इंडियन इन्स्टिट्युट ऑफ इंटिरिअर डिझाईनर्सच्या नाशिक विभाग अध्यक्षा वास्तुविषारद वैशाली प्रधान आणि व्हीनस आर्ट अकादमीच्या मार्गदर्शिका चित्रकर्ती सुहास जोशी आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहाणार आहेत. दि.१ ते ८ ऑगस्टपर्यंतच्या पहिल्या प्रदर्शनात अंजली भाटे, सुषमा पाटील, सायली झांबरे, रुपाली पवार, सुजाता अटल, सुनीता शिरोडे यांच्या कलाकृती प्रदर्शित करण्यात येतील.

दि.९ ते १६ दरम्यान श्रद्धा शेतकर, कविता बरवे, शिल्पा भाटिया, श्वेता गरे, नेहा बरवे, मनीषा अग्रवाल, सायली झांबरे यांची सुंदर चित्रे बघायला मिळतील. दि. १७ ते २३ ऑगस्ट दरम्यान अपूर्वा भंडारे, सुप्रिया जोशी, देविका काशीकर, स्नेहल बंकापुरे, आदिती पळसुले आणि दि.२४ ते ३१ ऑगस्ट या चौथ्या व शेवटच्या प्रदर्शनात पद्मजा ओतूरकर, माधवी पाठक, श्रद्धा रावल, निवेदिता पोतदार व स्मिता गांगल यांच्या चित्रांचा समावेश असेल. हा संपूर्ण कलामहोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. कलारसिकांनी चित्रप्रदर्शनाला उपस्थित राहून कलाकृतींचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संयोजक संजय देवधर व सर्व सहभागी कलाकारांनी केले आहे.

या लोकचित्रशैलींचा आहे समावेश

महाराष्ट्रातील आदिवासी वारली चित्रशैली सुपरिचित आहे. त्या खालोखाल बिहारची मधुबनी कला रसिकांना माहिती आहे. पण फारश्या माहिती नसणाऱ्या चित्रकथी, लिपण, टिकुली, साओरा, गोंड, पट्टचित्र, मांडणा, फड, गुर्जरी, कलमकारी, पिछवाई, मंडला, भिल्ल, हजारीबाग, संथाळ, धुलीशिल्प, लेदर पपेट्री अशा विविध प्रांतांच्या लोकचित्र शैलींचा संगम एकाच छताखाली झालेला बघायला मिळेल. नाशिककर कलारसिकांसाठी ही अपूर्व संधी आहे. येथे चित्रे अल्पदरात खरेदीही करता येतील.

# ज्येष्ठ नागरिकांच्या कर्तृत्वाला पुरस्कारातून मिळणार सन्मान

## ज्येष्ठ नागरिक सारथी सन्मान सोहळा १२ ऑगस्टला

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रत्येक घरातील आधार, समाजाची थिंक टँक, लहानग्यांचे मार्गदर्शक अन तितकेच सच्चे मित्र अशी भूमिका ज्येष्ठ नागरिक समाजात वावरतांना बजावतात. संपूर्ण आयुष्यातील अनुभवाची शिदोरी घेऊन वाटचाल करतांना आयुष्याची 'सेकंड इनिंग' आनंदाने जगत असतात. त्यांचा हा आनंद द्विगुणित करतांना त्यांच्या कर्तृत्वाला सन्मानित करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक सारथी सन्मान सोहळा २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचे आयोजक व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक सचिन बागड यांनी पत्रकार परिषदेत या अभिनव उपक्रम व स्पर्धेविषयीची माहिती दिली. बागड म्हणाले, कुटुंबाच्या, समाजाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना सन्मानित करण्यात यावे, या प्रेरणेतून स्पर्धेचे आयोजन केले आहे. मनोरंजनाने भरपूर अशा या अनोख्या ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळ्यात पुरस्कारांसह संगीत, मौज, मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन केले जाणार आहे. येत्या १२ ऑगस्टला दुपारी ३ वाजता मुंबई-आग्रा रोडवरील जत्रा हॉटेल जवळच्या श्री लक्ष्मीनारायण फेस्टिवल लॉन्स येथे हा कार्यक्रम होणार असल्याचे बागड यांनी सांगितले.

पुरस्कारांसाठी विविध गट तयार करण्यात आले आहे. प्रत्येक ज्येष्ठ नागरिकात एक खासियत असते. कुणी सदाबहार स्वभावाने परिचित असते. कुणी आपल्या काव्य शैलीतून, कुणाचा रुबाब भारदस्त असतो, तर कुणी आपल्या सामाजिक जाणीवेतून छाप पाडतो. आनंदाने जीवन जगतांना आपल्या जोडीदाराचे आयुष्य संपन्न करतांना ज्येष्ठ नागरिक महत्त्वाची भूमिका बजावतात. काहींची शोलेची दोस्ती सर्वांना परिचित असते. त्यामुळे स्पर्धेतील गट ठरवितांना या सर्व गुणवैशिष्ट्यांचा विचार केलेला आहे. यामध्ये सदाबहार पुरस्कार, काव्य सम्राट पुरस्कार, रुबाबदार पुरस्कार, कल्याणकारी पुरस्कार, गरुड झेप पुरस्कार, आनंद यात्री पुरस्कार, याराना पुरस्कार, दृष्टी पुरस्कार आणि जीवन साथी पुरस्कार असे ९ गट असतील.

ज्येष्ठ नागरिकांच्या शुभार्शिवादाने चैत्रबनचा भव्य शुभारंभ सोहळा

या कार्यक्रमानिमित्त 'चैत्रबन' या ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या गृहप्रकल्पाचा भव्य शुभारंभ सोहळा उपस्थित ज्येष्ठ नागरिकांच्या शुभार्शिवादाने पार पडणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आवडीनिवडी आणि निकड लक्षात घेऊन आरोग्य, मनोरंजन आणि अन्य विविध बाबींची काळजी या प्रकल्पात घेण्यात आली असून, हा प्रकल्प निश्चितच सर्वांच्या मनात घर करेल, असा विश्वास बागड यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ नागरिकांना या स्पर्धेत विनामूल्य सहभागी होता येणार आहे. त्यासाठी त्यांनी केवळ गुगल फॉर्मच्या लिंकद्वारे प्रवेशिका नोंदवायची आहे. यामध्ये ते सहभागी होऊ इच्छित असलेल्या गटाचा आवर्जुन उल्लेख करायचा आहे. प्राप्त प्रवेशिकांतून परीक्षकांमार्फत छाननी व पडताळणी करुन अंतिम स्पर्धकांना कार्यक्रमाच्या ठिकाणी सादरीकरणाची संधी उपलब्ध केली जाणार आहे. यानंतर अंतिम निकाल व पुरस्कारार्थींच्या नावाची घोषणा केली जाईल. जगण्यांचा आपला आनंद द्विगुणित करण्यासाठी जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन बागड यांनी यावेळी केले आहे. प्रवेशिका नोंदविण्यासाठी http://chaitraban.in/sarathi/ या लिंकला भेट द्यावी, व अधिक माहितीसाठी ७७२२०८९८८८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# लासलगावी मार्मिकचे संपादक विकृत मुकेश मचकर यांचा निषेध

**लासलगाव । वार्ताहर**

शिवसेनेच्या मार्मिक या मासिकाचे संपादक विकृत मुकेश मचकर यांनी ब्राह्मण समाजातील महिलांबाबत फेसबुक व्दारे सोशल मिडीयावर आक्षेपार्ह मजकूर शेअर केला त्यांच्या अशा बेताल वक्तव्याने समस्त ब्राम्हण समाजातील महिला वर्गाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.त्यामुळे लासलगाव तसेच विंचूर येथील समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने त्यांचा आणि मार्मिक या मासिकाचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करून त्यांच्या विरोधात लासलगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राहुल वाघ यांना निवेदन देण्यात आले.

विकृत मुकेश मचकर यांनी बेताल वक्तव्य केले म्हणून आम्ही त्याच्या घरच्यांवर काही टीका टिप्पणी करणार नाही.ब्राह्मण समाज हा शास्त्र जाणतो पण अशा विकृत मानसिकतेला ठेचायला शस्त्र हातात घ्यायला भाग पाडू नये. अशा पद्धतीचे वक्तव्य ब्राह्मण समाज्याच नाही कोणत्या समाजाच्या महिलेवर कुणीच करू नये असे ब्राह्मण महासंघ विश्वस्त स्मिता कुलकर्णी यांनी निषेध व्यक्त करतांना सांगितले.

या वेळी ब्राह्मण महासंघ नाशिक जिल्हा उपाध्यक्ष अक्षता जोशी,सविता जोशी,कल्याणी कुलकर्णी, रजनी कुलकर्णी,श्रद्धा डांगे,स्वाती जोशी,तृप्ती केंगे, लता कुलकर्णी,आदिती जोशी,स्वरा जोशी,सोमनाथ उपाध्ये,किशोर कुलकर्णी,भानुदास जोशी,अशोक अग्निहोत्री,दिपक कुलकर्णी,भास्कर जोशी,उमेश पारिक,निर्मल शर्मा, श्री जोशी, सुशील जोशी,इश्वर केंगे,ब्राह्मण महासंघ नाशिक जिल्हा युवाध्यक्ष गणेश जोशी,मयुर भंडारी,ऋषीकेश जोशी उपस्थित होते.

# आयमाचे माजी अध्यक्ष जयवंत शिर्के यांचे निधन



**नाशिक ।** अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयामा) चे माजी अध्यक्ष व उद्योजक जयवंत शिर्के (वय ८५) यांचे काल शुक्रवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पंचवटी अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. अंबड औद्योगिक वसाहतीतील प्रिसिजन कम्पोनन्ट कंपनीचे ते संचालक होते. आयमात विविध पदांवर त्यांनी कार्य केले. सन २००१ ते २००२ या काळात ते आयमाचे अध्यक्ष होते. उद्योजक जितेंद्र शिर्के यांचे ते वडील होत.

# श्रीकांत बेणी यांचा सह्याद्री भूषण पुरस्काराने गौरव

**नाशिक । प्रतिनिधी**



शतक महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या नाशिक वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी यांचा सह्याद्री भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. डॉ. शिवरत्न शेटे यांच्या हस्ते विविध क्षेत्रात प्रेरणादायी काम करणाऱ्या व्यक्तींचा सह्याद्री भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो.

१२ जुलै १६६० रोजी भर पावसात सिद्धी जौहरच्या पन्हाळ गडाच्या वेढ्यातून छत्रपती शिवाजी महाराज निसटून विशाळगडावर पोहोचले त्यावेळी झालेल्या पावनखिंडीतील रणसंग्रामात शूरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्यासह अनेक मावळ्यांनी प्राणांची आहुती दिली. हिंदवी परिवाराच्या वतीने गेल्या पंधरा वर्षांपासून दरवर्षी पावनखिंडीत ५२ किमी पायी जाऊन हिंदवी परिवाराचे सदस्य या ऐतिहासिक रणसंग्रामाचे स्मरण करतात. शिवव्याख्याते आणि हिंदवी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवरत्न शेटे यांच्या हस्ते विविध क्षेत्रात प्रेरणादायी काम करणाऱ्या व्यक्तींचा सह्याद्री भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो.

गेली ३२ वर्षे वसंत व्याख्यानमालेत काम करताना श्रीकांत बेणी यांनी सुमारे १ हजार व्याख्यानांचे आयोजन आजवर केलेले आहे. शताब्दी वर्षात तर यंदा जगभरातील व्याख्यात्यांना आमंत्रीत करून व्याख्यानामालेला लोकल ते ग्लोबल असे वैभवशाली स्वरूप प्राप्त करून देण्यात आले आहे. या कामाबद्दल डॉ. शिवरत्न शेटे यांच्या हस्ते श्रीकांत बेणी यांना सह्याद्री भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल बेणी यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# आजपासून आयएमएतर्फे 'महामनिकॉन'

## दोनदिवयीय परिषदेतून अर्थव्यवस्थापनावर मिळणार धडे

**नाशिक । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र आणि आयएमए नाशिक शाखेतर्फे राज्यस्तरीय वित्त व्यवस्थापनावर आधारित दोनदिवसीय परिषद आयोजित केली आहे. 'महामनिकॉन २०२३' ही परिषद शनिवार (दि २९) आणि रविवारी (दि.३०) आयएमए सभागृह येथे होणार असल्याची माहिती आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ, सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ यांनी दिली.

दरम्यान आयएमए राज्य अध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे, सचिव डॉ. संतोष कदम आणि खजिनदार डॉ. राजीव अग्रवाल हे परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. डॉ. विशाल गुंजाळ म्हणाले, रुग्णसेवा करताना अनेक डॉक्टर आर्थिक नियोजनाकडे हवे तेवढे सतर्क नाहीत. तर बऱ्याच वेळा फसव्या योजनांबाबत माहिती नसल्याने अनेकांची फसवणूक होते. सदस्यांमध्ये जागृकता करण्यासाठी ही परिषद आयोजित केली आहे.

डॉ. गोरे-मुठाळ म्हणाल्या, की परिषदेचे थेट प्रक्षेपण केले जाणार असून, प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन माध्यमातून राज्यभरातील डॉक्टर सहभागी होतील. सुमारे पंधराशेहून अधिक डॉक्टरांनी नोंदणी केली असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदेच्या पहिल्या दिवशी शनिवारी उद्योजक म्हणून डॉक्टरांची भूमिका,गुंतवणूक विषयक शासनाच्या विविध योजना, तसेच विमा व वैयक्तिक कवच, इक्विटीच्या माध्यमातून संपत्तीची निर्मिती, हॉस्पिटल व डॉक्टरांसाठी करप्रणाली अशा विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. दुसऱ्या दिवशी रविवारी ( दिं ३०) विविध सत्रांतून एसआयपी, चांगल्या स्टॉक्सची निवड कशी करावी, स्क्रीप्टोकरन्सी, व डिजिटल करन्सी, रिअल इस्टेट, मुलांसाठी आर्थिक नियोजन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

सर्व डॉक्टरांनी या परिषदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले. परिषदेसाठी डॉ. पंकज भट, डॉ. सागर भालेराव, डॉ. नीलेश जेजूरकर, डॉ. प्रेरणा शिंदे, डॉ. भूषण नेमाडे, डॉ. मनीषा जगताप, डॉ. मिलिंद भराडीया, डॉ. अनुप भारती, डॉ. मृगाक्षी क्षीरसागर, डॉ. निकिता पाटील, डॉ. विशाल पवार, डॉ. शलाका बागूल आदी परीश्रम घेत आहेत.

# मनपातर्फे ४ ऑगस्टपासून 'वृक्ष उत्सव २०२३'

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिका दरवर्षी विविध उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून नाशिक शहरातील नामांकीत संस्था हिरवांकुर यांच्या संयुक्त विद्यमानाने महापालिका नाशिक शहरामध्ये पहिल्यांदाच 'वृक्ष उत्सव २०२३' चे आयोजन करत आहे. नाशिक महापालिकेचे भाभानगरमधील दादासाहेब गायकवाड सभागृह येथे दि. ४ ऑगस्ट ते ६ ऑगस्ट या तीन दिवसांच्या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

मनपाच्या पर्यावरण विभागाच्या वतीने प्रदर्शनाची तयारी सुरू आहे. या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या देशी झाडांची माहिती देण्यात येणार आहे. प्रदर्शनामुळे पर्यावरण व वृक्षांविषयी जनजागृती निर्माण होऊन आपले शहर स्वच्छ, सुंदर बनविण्यास देखील हातभार लागणार आहे. त्याअनुषंगाने विविध पर्यावरणपूरक, नाविण्यपुर्ण उपक्रम, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्लास्टिक प्रदुषण मुक्त शहर करण्यासाठी विविध उपक्रम याठिकाणी घेण्यात येणार आहेत.

**CHANGE NAME**

I Have Change My Name From:
NILESH NIMBA PATIL
To
NILESH NIMBA DESALE
**ADDRESS -** A/P MUDI PRA. DANGARI, MUDI PR D. JALGAON, MUDI PRA. DANGARI, JALGAON, MAHARASHTRA 425401

**CHANGE NAME**

I Have Change My Name From:
NIMBA RAJARAM DESALE
To
NIMBA RAJARAM PATIL
**ADDRESS -** A/P MUDI PRA. DANGARI, MUDI PR D. JALGAON, MUDI PRA. DANGARI, JALGAON, MAHARASHTRA 425401

**CHANGE NAME**

I Have Change My Name From:
MINAKSHI NIMBA DESALE
To
MINAKSHI NIMBA PATIL
**ADDRESS -** A/P MUDI PRA. DANGARI, MUDI PR D. JALGAON, MUDI PRA. DANGARI, JALGAON, MAHARASHTRA 425401

# लोणारी समाज आर्थिक विकास महामंडळासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु

## मंत्री छगन भुजबळ यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**





लोणारी समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत मुख्यमंत्र्याशी सकारत्मक चर्चा झाली असून महामंडळ स्थापनेबाबत पाठपुरावा सुरु असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी लोणारी समाजाच्या शिष्टमंडळाला दिली.

लोणारी समाज नाशिक विभाग तसेच लोणारी उत्कर्ष मंडळाच्या सदस्यांनी नाशिक येथील कार्यालयात मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन निवेदन दिले. तसेच याप्रसंगी संघटनेच्या वतीने ना.छगन भुजबळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष भोलानाथ लोणारी, देविदास झगडे, शहराध्यक्ष दिपक लोणारी, शिवाजीराव लोणारी, दिनकर इंगळे, आशिक खांडेकर, प्रसाद कानडे, डॉ.प्रवीण बुल्हे, उमेश वादगे, निशान बुल्हे, विजय इंगळे, डॉ.सतीश कुऱ्हे, कैलास सत्सारकर, सुभाष कुऱ्हे, हरिभाऊ कुऱ्हे, संजय कुऱ्हे, राहुल कानडे, बाळू बुल्हे, संदीप धोक्रट, किरण धोक्रट, नाना उंडे, राजू कानडे, शिवाजी सत्सारकर, आण्णा बुल्हे, गोपीनाथ कुऱ्हे, धनंजय धोक्रट, रवींद्र खांडेकर, रामनाथ कुऱ्हे, द्वारकानाथ इंगळे, गोपी कुऱ्हे, अशोक कुऱ्हे, रुपचंद लोणारी, गंगा लोणारी, संजय लोणारी, गोरव गोडसे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी ना.छगन भुजबळ म्हणाले की, लोणारी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. महामंडळ निर्माण करण्याची लोणारी समाजाची मागणी शासनाने मान्य केली असून महामंडळ स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी आपला सातत्याने पाठपुरवठा सुरु असून लवकरच हे महामंडळ सुरु होईल. लोणारी समाजाने एकसंघ राहून संघटनात्मक काम करावे असे आवाहन त्यांनी लोणारी समाज बांधवाना केले.

## न्यूज कॉलम

### शहरात १५ दिवस आंदोलनास बंदी

**नाशिक ।** शहरात शनिवार (दि. २९) ते १२ ऑगस्ट या पंधरा दिवसांच्या कालावधीसाठी मनाई आदेश लागू करण्यात आले आहे. या कालावधीत जमावबंदी, आंदोलने, निदर्शने करण्यास सक्त मनाई करण्यात आल्याचे आदेश पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी गुरुवारी आदेश काढले आहेत. पाचपेक्षा अधिक लोक जमा होणार असल्यास पोलिस आयुक्तांची परवानगी अनिवार्य आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस आयुक्तांनी सांगितले.

### चिलारेत महिलेची गळफासाने आत्महत्या

**शिरपूर।** तापी चिलारे (ता. शिरपूर) येथील महिलेने गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना २७ जुलैस सकाळी घडली. छायाबाई भाईदास पावरा असे मृत महिलेचे नाव आहे. गावातील वीटभट्टीजवळ नाल्यात पळसाच्या झाडाला गळफास लावलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह आढळला. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.

# शिंदखेडा नगरपंचायतच्या भाजी मंडई ओटा लिलावास उस्फुर्त प्रतिसाद





**शिंदखेडा । प्रतिनिधी**

येथील नगरपंचायतने तहसील कार्यालयासमोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ भाजी मंडई ओटे बांधले आहेत. या ओट्यांची लिलाव प्रक्रिया नुकतीच पार पडली. लिलाव प्रक्रियेस शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नगरपंचायत मुख्याधिकारी तथा प्रशासक प्रशांत बिडगर यांच्या अध्यक्षतेखाली लिलाव प्रक्रिया पार पडली. यावेळी प्रशासकिय अधिकारी प्रल्हाद देवरे, करनिरीक्षक वामन अहिरे, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता प्रवीण साळुंखे आदी उपस्थित होते. यावेळी शहरातील नागरिकांनी लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदवत उच्चतम बोली लावून ओटे निवडले. भाजी मंडई ओटे लिलावात दिव्यांग बांधवांना अनुक्रमे १ ते ३ राखीव ठेवलेले असताना ८ नागरिकांची नावनोंदणी तर उर्वरित ५६ ओट्यांसाठी ७३ नागरिकांची नावनोंदणी झाली होती. असे एकुण ८१ नागरिकांनी लिलाव प्रक्रियेत सहभाग घेतला होता. सुरुवातीला भाजी मंडई ओटे १ ते ३ दिव्यांग साठी बोली लावण्यात आली. त्यात ओटा क्र ०१ साठी बोली लावली ती छायाबाई चंद्रकांत चौधरी यांनी. त्यांनी ९६ हजार रुपयांची बोली लावून अखेर पहिली बोली आपल्या नावावर केली. क्र. २ ची बोली अनिल भिकन सोनवणे यांनी ७० हजार तर क्र. ३ साठी महेंद्र अरुण मराठे यांनी ७५ हजार बोली लावून आपल्या नावावर केली. सर्वाधिक बोली ओटा क्र. ३८ साठी सरुबाई पुना वाडिले यांनी १ लाख ८० हजार तर ओटा क्र. ३९ साठी संजय धुडकु बडगुजर २ लाख २५ हजार रुपये तर सर्वात कमी ओटे क्र. ७ रज्जाक बागवान यांनी केवळ ३५ हजारात आपल्या नावावर केली. याप्रमाणे सर्व ओट्यांचे लिलाव चढ-उतार पद्धतीने पार पडले. संपूर्ण लिलाव प्रक्रिया शांततेत पार पडली. प्रशासकीय अधिकारी प्रल्हाद देवरे यांनी सर्व नियमावली वाचून दाखवत सदरील ओटे नगरपंचायत अंतर्गत ३-३ वर्षे असे नऊ वर्ष करारावर असुन सदर ओट्यांचा वापर केवळ भाजीपाला, फळ विक्रीसाठी उपलब्ध राहिल. या व्यतिरिक्त कोणताही अन्य व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास संबंधित ओटा रद्द करून कायदेशीर कारवाई केली जाईल. सदरील बोली रक्कम ना परतावा आहे. बोलिप्रक्रिया सूत्रसंचालन प्रशासकिय अधिकारी प्रल्हाद देवरे यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्याधिकारी तथा प्रशासक प्रशांत बिडगर यांनी केले. लिलाव प्रक्रियेसाठी बचतगट सहाय्यक अधिकारी दिनेशफुलपगारे, मनोज पाटील, अबु हसन शेख यांच्यासह नगरपंचायतच्या कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# हस्तीचा आरूष भामरे ९८.००% गुणांसह एस.एस. सी. बोर्ड परीक्षेत धुळे जिल्ह्यात सयुक्तपणे प्रथम

### पुनर्रतपासणीत गुणांमध्ये झाली वाढ

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा येथील विद्यार्थी आरूष दिनेश भामरे हा इ. १० वी. एस. एस. सी. बोर्ड परीक्षा मार्च २०२३ मध्ये संपन्न झालेल्या; व या परीक्षेचा दि. ५ जून २०२३ रोजी जाहीर झालेल्या ऑनलाइन निकालात ९७.००% गुणांसह धुळे जिल्ह्यात ६ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता.



सदरचा निकाल जाहिर झाल्यानंतर मात्र आरूष भामरेला दोन तीन विषयात जास्त गुण मिळण्याची खात्री होती. विशेषत: यात गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळण्याचा त्याला आत्मविश्वास होता. यास्तव आरूष व त्याच्या पालकांनी नाशिक विभागीय परीक्षा मंडळाकडे त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत मागणी; व पुनर्रतपासणी अर्ज सादर केला. यात नाशिक विभागीय एस. एस. सी. बोर्ड परीक्षा मंडळाने नियमानुसार सहकार्य करून, उत्तरपत्रिकांची पुनर्रतपासणी केली असता गणित विषयात ५ गुणांची वाढ झाल्याचे आढळून आले. व यात त्याला १०० पैकी १०० गुण मिळाले. या पुनर्रतपासणीतील वाढीव गुणांमुळे ' बेस्ट ऑफ फाईव्ह ' नुसार आधीचे ९७.००% गुण व १% गुण असे एकुण ९८.००% गुण आरूषला प्राप्त झाले. यामुळे तो एच.आर.पटेल कन्या विद्यालय शिरपूरची विद्यार्थिनी रेणुका संजय देशमुख ९८.००% गुण प्राप्त करून; धुळे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनीसोबत, संयुक्तपणे हस्ती स्कूलच्या आरूष दिनेश भामरे यानेही धुळे जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. हस्तीच्या आरूषचा हुषार व बुद्धिमान विद्यार्थी म्हणून लौकिक आहे. त्याने अभ्यासासोबत शालेय शिक्षणाच्या प्रत्येक क्षेत्रात प्राविण्य मिळविले आहे. त्याला विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्रविष्ट होण्याची आवड आहे. यात त्याने राष्ट्रीय पातळीवरील आयएमओ, एनएसओ, एनसीओ, मेंटल मॅथस्, नॉलेज हावर परीक्षांमध्ये गोल्ड मेडल्स; तर सर्वोदय अवार्ड स्कॉलरशिप, सिल्व्हर झोन हिंदी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षांमध्ये ब्रॉंझ मेडल्स तसेच गांधी विचार संस्कार परीक्षेत धुळे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. विशेषत: इ. ८ वी. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही तो पात्र ठरला आहे. तसेच शासकीय चित्रकला एलिमेंट्री व इंटरमिजीएट परीक्षेत ' क ' श्रेणी मिळविली आहे. सोबतच आरूषने स्काउट गाइड चळवळीतील कब चतुर्थ चरण राज्य पुरस्कार, गोल्डन एरो अवार्ड, स्काउट राज्य पुरस्कार प्राप्त केले आहेत. विशेषतः त्याने कर्नाटक येथे संपन्न झालेल्या स्काउट गाइड आंतरराष्ट्रीय जांभोरीतही यशस्वी सहभाग नोंदविला आहे. शालेय शिक्षणाच्या सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या हस्तीच्या आरूष भामरेने इ. १० वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादित करीत; धुळे जिल्ह्यात संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला आहे. यास्तव त्याचे हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष किशोर जैन, हस्ती स्कूल शालेय समिती चेअरमन कैलास जैन तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम व शाळेचे शिक्षक व पालक यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# वाघाडी येथील शहीद विरजवान मनोज माळी यांच्या स्मृती स्थळी भेट

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील वाघाडी येथील शहीद विर जवान मनोज माळी यांच्या स्मृती स्थळी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वना करून वीर जवानाच्या स्मरणार्थ उद्योगपती चिंतनभाई अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.




शिरपूर टेक्सटाइल पार्क चेअरमन चिंतनभाई अमरिशभाई पटेल यांनी वाघाडी येथील शहीद विरजवान मनोज माळी यांच्या स्मृती स्थळी दि. २६ जुलै २०२३ रोजी भेट देऊन अभिवादन केले. तसेच परिसरात वृक्षारोपण करुन परिवाराला भेटून सांत्वन केले. या वेळी भारतीय जनता पार्टी धुळे जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, वाघाडी सरपंच तथा भाजपा तालुकाध्यक्ष किशोर माळी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आकाश मराठे, पं. स. सदस्य यतिष सोनवणे, पंडित पाटील, विनोद पाटील, मनजीत पवार, रितेश राजपूत, जयसिंह राजपूत, गौरव पाटील, रणजित राजपूत, नितीन पाटील, वाघाडी ग्रामपंचायत उपसरपंच जगदीश कोळी, वाघाडी ग्रामपंचायत सदस्य संदीप शिरसाठ, राजेंद्र पाटील, सलाम मन्यार, नानाभाऊ रोकडे, दिवाण माळी, अरुण कोळी व ग्रामस् उपस्थित होते.

### गंगापूर धरण ६२ टक्क्यांवर; २ दिवसांत ७ टक्के वाढ

**नाशिक ।** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणातील पाणीसाठा मागील दोन दिवसांमध्ये ७ टक्क्यांनी वाढला आहे. गुरुवारी धरणात ६२ टक्के इतके पाणीसाठा नोंदविला गेला. मात्र गेल्या वर्षाच्या आजच्या दिवसाच्या तुलनेत हा साठा आठ टक्क्याने कमीच असल्याचे आकडेवारीतून दिसते. गतवर्षी याचवेळी गंगापूरमध्ये शहरवासीयांसाठी ७० टक्के पाणी होते. शहरात पाऊस होत नसला तरी धरणसमुह क्षेत्रात आणि इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या धरणांच्या तालुक्यांमध्ये गेल्या आठवड्यापासून पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढत आहे. दारणा धरण ७६ टक्के भरल्याने परिचलन नियमाप्रमाणे त्यातून विसर्ग सुरू आहे.

# साक्री येथे ब्राह्मण समाजाचा वार्षिक स्नेह मेळावा व गुणगौरव सोहळा संपन्न

**साक्री । प्रतिनिधी**



साक्री तालुका ब्राह्मण सभेच्या वतीने वार्षिक स्नेह मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. याप्रसंगी श्री. भालचंद्र कुलकर्णी (संपादक, आम्ही सारे ब्राह्मण) 'फुलपाखरू' टीव्ही मालिका फ्रेम तारका कुमारी. तृष्णा चंद्रात्रे, साक्री नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष श्री बापूसाहेब गीते, श्री हेमंत पवार, श्री. गणू महाराज तसेच धुळे जिल्हा भाजपा सरचिटणीस श्री शैलेंद्र आजगे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. किशोर कुलकर्णी व सर्व मान्यवरांनी दीप प्रज्वलन व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

याप्रसंगी आलेल्या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. भालचंद्र कुलकर्णी यांनी ब्राह्मण समाजमध्ये, समाजात परिवर्तन करण्याचे सामर्थ्य आहे असे नमूद केले. तसेच ब्राह्मण समाजाने एकत्रित यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कु. तृष्णा चंद्रात्रे हिने विद्यार्थ्यांने आलेल्या संधीचे सोने करावे व आपले ध्येय पूर्ण करावे असे मत मांडले. श्री शैलेंद्र आजगे यांच्या मते ब्राह्मण समाज हा नेहमी इतर समाजांना मार्गदर्शन करतो व ते त्यांनी पुढेही करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. श्री हेमत पवार यांनी ब्राह्मण समाजाशी असलेल्या आपल्या ऋणानुबंध विषयी मत मांडले. श्री. किशोर कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात साकीतील सर्व समाजाने एकजुटीने राहावे असे म्हटले तसेच त्यांनी समाजातील लोकांनी केलेल्या सहकार्याबद्दल ऋण व्यक्त केले. सदर कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच समाजातून विशेष प्राविण्य मिळवलेल्या ब्राह्मण सदस्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री उमाकांत देशपांडे व डॉ. निलेश माळीचकर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री संजय दीक्षित यांनी मांडले. या कार्यक्रमास आर्थिक योगदान केले आहे श्री सुनिल जोशी हरीश पिसोळकर संकेत जोशी म्हसदी सोपान काका जोशी संजय दिक्षीत वि का दिक्षीत व कार्यक्रमाचे अन्नदान श्री गणु महाराज यांनी केले.

# महिलांचे चिखलात योगा आंदोलन; समाजमंदिरे, सभागृहे खुली करण्याची महिलांची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

पाऊस आणि चिखलामुळे मैदाने, उद्यानांमध्ये योगा, प्राणायाम, हास्ययोगासह व्यायाम करण्यास अडचणी येत आहे. यासमस्येकडे पालिकेच्या संबंधित विभागाचे लक्ष वेधण्यासाठी प्रभाग २४ मधील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी थेट चिखलात बसूनच योगा आंदोलन केले. यावेळी सभागृहे, समाजमंदिरे नागरिकांसाठी खुली करावी, अशा मागणीचे निवेदन महापालिका आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्याकडे देण्यात आले.

# आसनगाव ते खाडी-ठाणे रस्ता होणार खड्डेमुक्त; मंत्री भुसेंचे मुख्यमंत्र्यांना साकडे

### वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजनेसह दोन दिवसात डागडुजीचे काम सुरू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**नाशिक । प्रतिनिधी**

आसनगाव ते खाडी ठाणे पूल या रस्त्याची प्रचंड वाताहात आणि दुर्दशा झालेली आहे. रस्त्यात अनेक ठिकाणी काम सुरु आहेत मात्र ते पूर्णत्वास आलेले नाही. तसेच खड्डे तयार झालेले आहेत. खड्ड्यांमुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेवून सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी मुख्यमंत्र्यांच्या निर्दर्शनास रस्त्यांची परिस्थिती आणून देत ताबडतोब रस्त्याचे काम जलदगतीने व्हावे हे आदेशित करावे अशी विनंती मुख्यमंत्र्याना केली. मंत्री भूसेंची मागणी लक्षात घेत मुख्यमंत्र्यांनी देखील संबंधित विभागाला आसनगाव-ठाणे रस्त्याची ताबडतोब डागडुजी करण्याचे आदेश दिले आहेत.

ना. दादाजी भुसे हे नेहमीच आपल्या कामांमुळे चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचां कार्यभार स्वीकारल्या नंतर त्यांनी कामांचा धडाका सुरु केला आहे. आसनगाव रस्त्यावर प्रवास करत असताना काही प्रवाशांनी मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनीवरून संपर्क साधत सबंधित रस्त्याची झालेली वाताहत सांगितली. प्रवाशांच्या फोनची दखल घेत तातडीने मंत्री भुसे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सद्यस्थितीचा आहवाल मागवत रस्त्याच्या दुरुस्तीचे साकडे मुख्यमंत्र्यांना घालत हा विषय मार्गी लावण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांनी देखील दोन दिवसात काम सुरू करण्याचे आदेश दिल्याने वाहन चालक तसेच प्रवासी यांची परवड थांबणार आहे. नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. मुख्यमंत्री आणि दादाजी भुसे यांच्या चर्चेनंतर या रस्त्याचे डागडुजीचे काम येत्या दोन दिवसात सुरू होणार आहे. यामुळे दररोज हजारो प्रवाशांचे होणारे हाल थांबणार आहेत.

# अंगणवाडी पोषण आहाराचे प्रती लाभार्थी २० रूपये मानधन द्या!

### पोषण आहार पुरविणाऱ्या बचत गटातील महिलांची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**



अंगणवाडी पोषण आहाराचे प्रती लाभार्थी २० रूपये मानधन द्यावे, अशी मागणी पोषण आहार पुरविणाऱ्या बचत गटातील महिलांनी शासन प्रशासनाकडे केली आहे. याबाबत निमडाळे येथील सावित्रीबाई धुळे तालुका महिला बचत गट अनुरक्षण असोसिएशनच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील बचत गटातील महिलांनी बुधवारी जिल्हाधिकारी, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण अधिकारी यांना निवेदन दिले. तत्पूर्वी आमदार कुणाल पाटील यांनाही निवेदन दिले आहे. ते पावसाळी अधिवेशनात हा विषय मांडणार आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, महिला व बालविकास विभाग यांच्यातर्फे तीन ते सहा वर्षे वयोगटाच्या बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी अंगणवाडीमार्फत पोषण आहार वाटपाची योजना शासनामार्फत राबविली जाते. त्यानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांना गरम आणि ताजा आहार पुरविण्यासाठी सुचित करण्यात आले आहे. बचत गटातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सदर पोषण आहार बचत गटातील महिलांमार्फत शिजवून बालकांना वाटप करण्याचे काम दिले आहे. सन २०१६ २०१७ पासून आठ रुपये प्रती लाभार्थी याप्रमाणे बचत गटांना पोषण आहार मानधन दिले जाते. सद्यस्थितीत सर्वत्र महागाईने उच्चांक गाठलेला आहे. भाजीपाला, टमाटे, कडधान्य, गॅस, इंधन, खाद्यतेल आदींच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. यापुढेही महागाई वाढणारच आहे. पोषण आहाराचे प्रती लाभार्थी मिळणारे मानधन हे फारच अल्प असून, सदर मानधनाची बिले देखील बचत गटांना वेळेवर मिळत नाहीत. मागील दहा महिन्यांपासून पोषण आहाराचे मानधन आणि बिले थकलेली आहेत. अल्प मानधन, महागाई, वेळेवर मानधन बिले न मिळणे, वेळेवर गहू व तांदूळ न मिळणे यामुळे बचत गटातील महिलांवर आर्थिक संकट निर्माण होत आहे. आर्थिकदृष्ट्या महिला सक्षम होण्याऐवजी कर्जबाजारी होऊन तिच्यावरील कर्ज वाढत आहे. बिले वेळेवर न मिळाल्यामुळे पोषण आहार वाटपासाठी बचत गटातील महिलांना किराणा उधारीवर आणावा लागतो. त्यामुळे बचत गट आर्थिक संकटांच्या ओझ्याखाली येत आहेत. परिणामी पोषण आहार योजना व आर्थिकदृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण या दोन्ही योजना निष्क्रिय ठरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अंगणवाडी पोषण आहार प्रती लाभार्थी मानधन आठ रुपये वाढवून १८ ते २० रुपये करण्यात यावे, मानधनाची बिले दर महिन्याला मिळावीत, तसेच रेशनमध्ये मिळणारा गहू आणि तांदूळ हा देखील अंगणवाडीसाठी वेळेवर मिळावा आदी मागण्या निवेदनात केल्या आहेत. यावेळी बचत गट असोसिएशनच्या अध्यक्षा शोभा हरी जाधव यांच्यासह लताबाई देविदास नेरकर, सुवर्णाबाई जितेंद्र हातगीर, प्रमिला मगन पवार, सोनी धनराज सूर्यवंशी, विमलबाई बागुल, मंगलाबाई रवींद्र मिस्तरी, एस. व्ही. चव्हाण यांच्यासह बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# भिडेंना अटक करा अन्यथा,काँग्रेस रस्त्यावर उतरेल:आ.पाटील













धुळे ।
राष्ट्रपिता महात्मा गांधीजींबद्दल अवमानकारक वक्तव्य करणार्या संभाजी भिडे नामक व्यक्तीला तत्काळ अटक करावी अन्यथा काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. दरम्यान सरकारमध्ये बसलेले जातीयवादी आणि मनुवादी लोक संभाजी भिडे यांना संरक्षण देत आहेत. भिडेंच्या अवमानकारक वक्तव्यामुळे देशातील प्रत्येक नागरीकास वेदना झाल्या आहे. म्हणून भिडेंना अटक करुन कठोर शासन झाले पाहिजे जेणेकरुन येणार्या काळात गांधीजींबद्दल अवमान करण्याचे धाडस कोणीही करणार नाही असा घणाघात आ.कुणाल पाटील यांनी केला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल धुळे जिल्हा व शहर काँग्रेसच्यावतीने महाराष्ट्र काँग्रेस कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली धुळ्यातील गांधी पुतळ्याजवळ निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी महत्मा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला. निषेध आंदोलनात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शामकांत सनेर, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ.अनिल भामरे, ज्येष्ठ नेते रमेश श्रीखंडे, साबीर खान,पिंताबर महाले, खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील, माजी पं.स.सभापती भगवान गर्दे,बाजार समितीचे संचालक एन.डी.पाटील, तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष अशोक सुडके, बाजार समितीचे उपसभापती योगेश पाटील पं.स.चे माजी सदस्य पंढरीनाथ पाटील, बाजार समितीचे माजी सभापती गुलाबराव पाटील, इंटक जिल्हाध्यक्ष प्रमोद सिसोदे, साक्री तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष दिपक साळुंके, शहर काँग्रेस उपाध्यक्ष प्रा.जसपालसिंह सिसोदिया,जिल्हा बँकेचे संचालक प्रकाश पाटील,मुकूंद कोळवले, अॅड.बी.डी.पाटील, माजी सरपंच सोमनाथ पाटील, संचालक बापू खैरनार,भानुदास माळी,उत्तमसिंग राजपूत,संतोष राजपूत आदी सहभागी झाले होते.

संकलन : दिपक वाघ

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# 'द ब्रेड ऑफ लाईफ डॉ. पांडुरंग खानखोजे 'द अनसंग हिरो' नाटकाने धुळेकर रसिक दंग













धुळे। 'आझादी का अमृत महोत्सवा' अंतर्गत मेराकी परफॉर्मिंग आर्ट्स ऑर्गनायझेशन, नागपूर यांनी मंगला सानप 'द ब्रेड ऑफ लाईफ-डॉ. पांडुरंग खानखोजे - द अनसंग हिरो'या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. वर्धा जिल्ह्यातील क्रांतीकारी कृषी शास्त्रज्ञ पांडुरंग खानखोजे यांचे भारतात हरीतक्रांती घडवून आणण्यात सर्वात मोठे योगदान आहे, त्यांचे कृषी क्षेत्रातील कार्य अनमोल आहे तसेच देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भारतातल्याच नव्हे तर परदेशातल्या भारतीय लोकांची देशासाठी मदत आणण्याची महत्वाची भूमिका बजावली. द ब्रेड ऑफ लाईफ - डॉ खानखोजे : द अनसंग हिरो' हे नाटक त्यांच्या जीवनावर आधारीत आहे. पुष्पक भट, हर्षवर्धन देशमुख, कृष्णा लाटा, ऋतुराज वानखेड़े, शुभम गौतम, अविनाश अरोरा, श्रेयस भारसाकळे, कुणाल टोंगे, कुणाल मेश्राम, सिद्धांत पटेल, चैतन्य दुबे, अनुक्षा आर्गे, महक त्रिपाठी, निश्चय बेलानी, बुद्धांश, शुभम शेंडे यांनी ऑनस्टेज भूमिका निभावली. प्रकाशयोजना अक्षय खोब्रागडे, संगीत संयोजन नारायण, संगीत संचालन निकीता ढाकुलकर, रंगभूषा व वेशभूषा ऋतुजा वानखेडे, नेपथ्य अलियर, अंकित ठाकरे, शुभम गौतम, और प्रबंध व समन्वयन हितेश यादव, मयूर मानकर यांचे तर कला सहायक रीतेश, सिनोग्राफी अलियर यांची होती. धुळेकर नागरिकांनी यावेळी नाटकांचे कौतुक देखील केले.